**खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे**

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

**राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे**

# प्रसिद्धी विभाग

# शैक्षणिक वर्ष : २०२४ – २५

## साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमाला – मा. संजय आवटे

दि. २९ जानेवारी २०२५

लोकमत

## ‘मुलांना ‘माणूस’ करण्याचे मोठे आव्हान’

लोकमत न्यूज नेटवर्क



साहेबरावजी बुट्टे-पाटील स्मृती व्याख्यानमालेत उपस्थित नागरिक.

**राजगुरूनगर :** हल्ली पालकांनी आपल्या मुलांना करिअरचे घोडे केले आहे. नवी पिढी अधिक बुद्धिमान असून, त्यांना मुक्त अवकाश देण्याची गरज आहे. त्यांना आवडत्या क्षेत्रात हवं ते करू द्यायला हवं. नव्या पिढीच्या भाषेत संत ज्ञानदेव, संत तुकाराम यायला हवेत. शाहू-फुले-आंबेडकरांचा वैचारिक वारसा पोहोचवायला हवा. यासाठी मुलांना ‘माणूस’ करण्याचे आव्हान आपल्यासमोर असल्याचे प्रतिपादन ‘लोकमत’चे संपादक संजय आवटे यांनी केले.

खेड तालुका शिक्षणप्रसारक मंडळाच्या वतीने हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टे पाटील स्मृती व्याख्यानमालेत ते बोलत होते. याप्रसंगी संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे-पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक शांताराम घुमटकर, बाळासाहेब सांडभोर, ॲड. राजमाला बुट्टे पाटील, सभापती विजयसिंह शिंदे, ॲड. सर्जेराव पानसरे, प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, डॉ. एच. एम. जरे, प्रबंधक के. आर. पाचारणे आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

संजय आवटे पुढे म्हणाले की, शाश्वत विकास म्हणजे सार्वजनिक नळाला येणारे पाणी डोळे झाकून पिता यायला हवे. सार्वजनिक आरोग्य व वाहतूक व्यवस्थेचा वापर श्रीमंतांनी करायला हवा. महिलांना रस्त्यावर मोकळेपणाने फिरता यायला हवे. विकासाचा केंद्रबिंदू सामान्य माणूस असावा. महापुरुषांना जाती-जातींत अडकवून न ठेवता सर्वधर्म समभावाचा वारसा सांगणारा खरा भारत पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवायला हवा, असे ते म्हणाले. सूत्रसंचालन डॉ. श्वेतांबरी मांडे, परिचय डॉ. संजय शिंदे व आभार सानिया हजारे हिने मानले.

Hello Pune Gramin
Page No. 3 Feb 01, 2025
Powered by: erelego.com

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख